महाराष्ट्राचा हक्काचा आवाज
दैनिक बीड लोकनेता
मुख्य संपादक : ज्ञानेश्वर मुंढे
Lokneta News - लोकनेता न्युज
रविवार ७ जून २०२६ RNI-MAHMAR/2023/89402 Email : dnyaneshmofficial@gmail.com वर्ष : ०३ अंक : २८८ किंमत २ रुपये 7499615933




# भुजबळ लवकरच दिल्लीत दिसणार?

# राष्ट्रवादीत मोठ्या घडामोडींना वेग

## राज्यसभेच्या उमेदवारीबाबत राष्ट्रवादीच्या नेत्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली


राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर राज्यसभा खासदारकीचा राजीनामा दिला होता. आता या रिक्त झालेल्या जागेवर कुणाला संधी द्यायची याबाबत राष्ट्रवादीत चर्चा सुरू आहे. समोर आलेल्या माहितीनुसार ज्येष्ठ नेते छगन भुजबळ हे राज्यसभेसाठी उत्सुक असल्याची माहिती समोर आली आहे. याबाबत आज राष्ट्रवादीच्या नेत्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यानंतर आता पुन्हा राष्ट्रवादीच्या नेत्यांची बैठक सुरू आहे. राष्ट्रवादीचे प्रमुख नेते या बैठकीला हजर आहेत. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

राष्ट्रवादीच्या नेत्यांच्या बैठकीला सुरुवात

राज्यसभेच्या उमेदवारीच्या संदर्भात अंतिम निर्णय घेण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. वर्षा या शासकिय निवासस्थानी झालेल्या या बैठकीला पार्थ पवार, सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल आणि छगन भुजबळ हे नेते उपस्थित होते. मुख्यमंत्र्यांशी चर्चा केल्यानंतर आता राष्ट्रवादीच्या नेत्यांची स्वतंत्र बैठक सुरू झाली आहे. या बैठकीत राज्यसभेच्या उमेदवाराबाबत अंतिम निर्णय होण्याची शक्यता आहे. व्यक्ती केंद्रात आणि एक व्यक्ती राज्याच्या मंत्रिमंडळात

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बैठकीत पक्षाच्या सुरुवातीपासूनच्या जडणघडणीत भुजबळ कुटुंबाचा कसा पुढाकार पुढाकार होता, याची माहिती छगन भुजबळ यांनी दिली. अजित पवार यांचं कुटुंब, तटकरे यांचं कुटुंब यांना जो न्याय लावण्यात आला तो भुजबळ कुटुंबाला का नाही असा सवालदेखील यावेळी उपस्थित करण्यात आला. अजित पवार आणि तटकरे कुटुंबातील एक व्यक्ती केंद्रात आणि एक व्यक्ती राज्याच्या मंत्रिमंडळात आहे, याचीही आठवण करून देण्यात आली. त्यामुळे आता नेमके काय होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दोन दिवसांचा अवधी अद्याप बाकी

दरम्यान, भुजबळ यांना दिल्लीत संधी दिली जाण्याची दाट शक्यता आहे. तर समीर भुजबळ यांना केंद्रात राज्यमंत्रिपद दिलं जाऊ शकतं. राज्यसभेसाठी उमेदवारी दाखल करण्यासाठी अद्याप दोन दिवस बाकी आहेत. 8 जूनच्या दुपारी तीन वाजेपर्यंत इच्छुकांना अर्ज करता येणार आहे. त्यामुळे काय होणार? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.



### ही नावेही चर्चेत

राज्यसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी अवघे 2 दिवस शिल्लक आहेत. 8 जून सोमवारी दुपारी 3 वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आहे. त्यामुळे येत्या दोन दिवसात उमेदवाराच्या नावाची घोषणा केली जाणार आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार प्रमोद हिंदुराव, छगन भुजबळ, अविनाश आदिक, समीर भुजबळ यांची नावेही चर्चेत आहेत, आता कुणाला राज्यसभेची लॉटरी लागते हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### छगन भुजबळांना उमेदवारी मिळण्याची शक्यता

छगन भुजबळ यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून उमेदवारी मिळण्याची दाट शक्यता आहे. केंद्रात छगन भुजबळ तर राज्यात छगन भुजबळ यांच्या मंत्रिपदाच्या आणि आमदारकीच्या जागेवर समीर भुजबळ यांना संधी देण्यात यावी या संदर्भात राष्ट्रवादीचे नेत्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. वर्षा निवासस्थानाची बैठक संपवून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांच्या सातपुडा या शासकीय निवासस्थानी बैठकीसाठी पुन्हा पोहचले आहेत. आता या बैठकीत अंतिम निर्णय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे संपूर्ण राज्याचे लक्ष या बैठकीकडे लागले आहे.

## एसीबीची धडक कारवाई; 10 हजारांची लाच घेताना पोलीस अंमलदार जेरबंद



नेकनूर/प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील नेकनूर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस अंमलदार दत्तात्रेय बळवंत यांना 10 हजार रुपयांची लाच स्वीकारताना जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहात पकडल्याने जिल्हा पोलीस दलात एकच खळबळ उडाली आहे. शनिवारी (दि. 6) दुपारी ही कारवाई नेकनूर पोलीस ठाण्याच्या आवारात करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, एका प्रकरणातील काम करून देण्यासाठी संबंधित अंमलदाराने तक्रारदाराकडे लाचेची मागणी केली होती. याबाबत एसीबीकडे तक्रार दाखल झाल्यानंतर पथकाने पडताळणी करून सापळा रचला. उपअधीक्षक बाळासाहेब जाधवर यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने कारवाई करत अंमलदार दत्तात्रेय बळवंत यांना 10 हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडले.

## पाचोड येथील शिवछत्रपती महाविद्यालयात 353 वा शिवराज्याभिषेक दिन संपन्न

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
पाचोड प्रतिनिधी /त्रिसिंग जायभाये

दि. ६ जून १६७४ रोजी रायगडाच्या पवित्र भूमीवर सानंद संपन्न झालेला हा शिवराज्याभिषेक सोहळा केवळ एका राजाच्या सिंहासनारोहणाचा कार्यक्रम नव्हता, तर तो हिंदवी स्वराज्याच्या सार्वभौमतेची जगासमोर झालेली अधिकृत घोषणा होती. प्रजेच्या मनात स्वाभिमान, आत्मविश्वास आणि स्वातंत्र्याची ज्योत प्रज्वलित करणारा चैतन्यदायी सुवर्णक्षण होता. म्हणूनच सहा जून हा आजचा दिवस महाराष्ट्रासाठी आणि संपूर्ण भारतासाठी अभिमानाचा, प्रेरणेचा आणि राष्ट्रभक्तीचा दिवस मानला जातो असे प्रतिपादन पाचोडचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. सचिन पंडित यांनी केले.

येथील शिवछत्रपती महाविद्यालयात श्रीमंतयोगी छत्रपती शिवाजी महाराज यांचा 353 वा राज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला. त्यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. सचिन पंडित प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे हे होते. प्रारंभी स्त्रियांचा सन्मान करण्यात प्रख्यात असलेले छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. सचिन पंडित यांचे शाल आणि पुष्पगुच्छ देऊन यथोचित स्वागत करण्यात आले. आजच्या तरुणांसाठी हिंदवी स्वराज्याचा शिवराज्याभिषेक



दिन विशेष प्रेरणादायी आणि ऊर्जादायी आहे. नेतृत्व, संघटन कौशल्य, धैर्य, दूरदृष्टी, प्रामाणिकपणा आणि राष्ट्रनिष्ठा या सदगुणांचे महत्त्व सर्वधर्मसमभाव जपणा-या छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वातून शिकता येते. शिवरायांनी प्रतिकूल परिस्थितीतही संघर्ष केला, पण हार मानली नाही. संकटांना संधीमध्ये बदलून त्यांनी स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली. हीच प्रेरणा आजच्या युवकांना जीवनातील आव्हानांचा सामना करण्यासाठी उपयोगी ठरू शकते असे मत प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी व्यक्त केले. ते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलत होते. सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक बीसीए महाविद्यालयाचे प्राचार्य अप्पासाहेब नेमाने यांनी केले तर सूत्रसंचालन आणि आभार श्रीकांत चिंचखेडे यांनी मानले. यावेळी पो. कॉ. नेताजी जाधव, वैभव राऊत, मुरलीधर झिने, विजय जिने, मनोज राक्षे आदी उपस्थित होते.

## शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा



**लोकनेता न्यूज नेटवर्क**
शेळगाव प्रति. राहुल जाधव

आज दिनांक ०६ जून २०२६ रोजी सकाळी ठीक १०:०० वाजता शेळगाव येथील ग्रामपंचायत कार्यालयात 'शिवराज्याभिषेक दिन' अत्यंत उत्साहात आणि प्रेरणायुक्त वातावरणात साजरा करण्यात आला.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या दैदिप्यमान इतिहासाला उजाळा देण्यासाठी या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आणि दीपप्रज्वलन करून करण्यात आली. 'जय भवानी, जय शिवाजी' आणि 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' या घोषणांनी संपूर्ण ग्रामपंचायत परिसर दुमदुमून गेला होता. याप्रसंगी गावातील सरपंच उर्मिला शिंगाडे, ग्रामपंचायत अधिकारी चंद्रकांत जगताप, गावातील प्रतिष्ठित नागरिक, प्रगतशील बागायतदार आणि सर्व ग्रामपंचायत कर्मचारी, स्थानिक शाळांचे शिक्षक, आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## देगलुर मधे शिव राज्याभिषेक दिन साजरा

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
देगलूर प्रतिनिधी/संतोष चिद्रावार लोणीकर

देगलूर येथे आज ६ जुन रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य , ऐतिहासिक राज्याभिषेक सोहळा झाला. हा ऐतिहासिक दिवस शिव राज्याभिषेक दिन म्हणुन साजरा केला जातो . याला ३५२ वर्षे झाली आहेत . या औचित्यावर दर वर्षी प्रमाणे सकाळी नऊ वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३५२ वा राज्याभिषेक दिन देगलुर येथे शिवस्मारक अध्यक्ष ॲड. अंकुश देसाई देगावकर , २०२६ शिव जन्मोत्सव समिती अध्यक्ष नामदेव थडके , शिवसेना जिल्हा उपाध्यक्ष व्यंकटराव जी पाटील



खतगावकर , अशोकजी पाटील राजुरकर , बालाजी पाटील थडके यांच्या द्वारे अभिषेक करून डॉ. सुनील जाधव यांनी जिजाऊ वंदना गाऊन मानवंदना देऊन उत्साहात संपन्न झाला. राजु पाटील मलकापुरकर, खालिद पटेल , माधव पाटील लिंगनकेरुरकर , भागवत पाटील सोमुरकर , विठ्ठलराव भोसले , शेतकरी नेते , कैलास भाऊ येसगे जिजाऊ ब्रिगेड तालुकाध्यक्ष चैतन्या वानखेडे , सचिव रंजना मानुरे , कार्याध्यक्ष दिपाली पाटील , संगीता कदम डॉ. सुनील जाधव, उमाकांत भुताळे, विकास मोरे , सुनील थडके , शिवाजीराव वरखिंडे गवंडगावकर , ईतर अनेक शिव प्रेमींच्या उपस्थिती मधे दुग्धाभिषेक करून शिव राज्याभिषेक संपन्न झाला . गटविकास अधिकारी श्रीकांत बळदे , देवेंद्र जी मोतेवार , बांधकाम सभापती सुमंत कांबळे ,नगर सेवक बसवराज द्याडे , सय्यद भाई, चंद्रकांत मोरे व सुनील नागशेट्टीवार यांनी ही अभिवादन केले . सर्व शिव प्रेमींनी घोषणा देऊन परिसर दुमदुमून काढला . वातावरण शिवमय झाले . डॉ. सुनील जाधव यांनी सुत्रसंचालन केले . आभार नामदेव थडके यांनी मानले*.

## जीवन जाधव औसा अनुसूचित जाती आरक्षण उप- वर्गीकरणाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी --गजानन वाघमारे




**लोकनेता न्यूज नेटवर्क**
हिमायतनगर लक्ष्मण शेन्नेवाड

गेल्या अनेक वर्षांपासून अनुसूचित जाती आरक्षणाचे अ,ब,क,ड असे वर्गीकरण करण्याची मागणी मातंग समाजाची असुन शासनाने लवकरात लवकर आरक्षण उप-वर्गीकरणाची अंमलबजावणी करावी डॉ.अण्णाभाऊ साठे क्रांती सेनेच्या वतीने तालुकाध्यक्ष गजानन वाघमारे यांनी मागणी केली आहे.

ऑगस्ट २०२४ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या ७ न्यायाधीशांच्या घटनापीठाने ऐतिहासिक निकाल देत अनुसूचित जाती (sc) आणी अनुसूचित जमाती (st) आरक्षणात उपवर्गीकरण करण्यास राज्यांना घटनात्मक मंजुरी दिली होती.तरी पण राज्य शासनाने वर्गीकरण केले नसल्याने डॉ.अण्णाभाऊ साठे क्रांती सेनेच्या वतीने पुणे ते मुंबई भव्य मोर्चा काढण्यात येणार असल्याचे वाघमारे यांनी सांगितले हा मोर्चा १७ जुन २०२६ रोजी प्रारंभ होणार असुन २४ जुन २०२६ मुंबई आझाद मैदानावर धडकणार असुन ह्या मोर्चातील मागण्या अनुसूचित जाती आरक्षणाचे उप-वर्गीकरण तात्काळ करावे, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार देण्यात यावा,१ ऑगस्ट रोजी शासकीय सुटी जाहीर करण्यात यावी,वाटेगाव येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे स्मारक तात्काळ उभारावे, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ यांचा निधी वाढविण्यात यावा,आर्टी संस्थेचे बजेट वाढवावे, घाटकोपर येथे अण्णाभाऊ साठे यांचे स्मारक विकसित करावे, समाजासाठी अत्यंत आवश्यक असलेल्या स्मशानभूमी व गायरान जमीनीचा प्रश्न मार्गी लावण्यात यावा ह्या प्रमुख मागण्या असल्याचे स
गजानन भाऊराव वाघमारे यांनी सांगितले. यावेळी जिल्हा सचिव संतोष बनसोडे व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## महाराष्ट्र समाजभूषण पुरस्कार २०२६ सोहळा उत्साहात संपन्न

**लोकनेते न्यूज नेटवर्क**

पुणे : (प्रतिनिधी विजय जगताप) "1 Vision Family" आणि "दर्शन प्रॉडक्शन्स" यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला "महाराष्ट्र समाजभूषण पुरस्कार २०२६" हा भव्य पुरस्कार सोहळा बुधवार दिनांक ३ जून २०२६ रोजी पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवन, घोले रोड, पुणे येथे मोठ्या उत्साहात आणि दिमाखात संपन्न झाला.

समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा यावेळी सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक तसेच व्यावसायिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. या सोहळ्यास महाराष्ट्र विधान परिषदेच्या मा. उपसभापती सौ. डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी शुभेच्छा देत समाजासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करणे ही अत्यंत प्रेरणादायी बाब असल्याचे सांगितले. तसेच पुणे महानगरपालिकेच्या विरोधी पक्ष नेत्या सौ. स्वरदाताई बापट आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष श्री. अशोकराव पलांडे यांनीही समाजातील सकारात्मक कार्याला प्रोत्साहन देणारे असे उपक्रम अधिकाधिक व्हावेत असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून श्री. रविराज काळे, श्री. राहुल लोहोगावकर आणि डॉ. राम यादव उपस्थित होते.




त्यांनीही पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन करून समाजासाठी कार्यरत राहण्याचे आवाहन केले.

संपूर्ण कार्यक्रमामध्ये पुरस्कार वितरण, मान्यवरांचे मार्गदर्शन, सांस्कृतिक वातावरण आणि उपस्थितांचा उत्स्फूर्त प्रतिसाद यामुळे सोहळ्यास विशेष रंगत आली.

या कार्यक्रमाचे आयोजन श्री. अमित सोनवणे, सौ. ज्योती आशिष जैन, सौ. निकिता दर्शन जैन, डॉ. ममता जैन आणि व्यास माधव यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थित मान्यवर आणि नागरिकांनी आयोजकांचे कौतुक केले.

## संपादकीय

# बनावट आयुर्वेदिक "चा विळखा

आयुर्वेद ही भारताची प्राचीन आणि प्रभावी उपचार पद्धती मानली जाते.मात्र राज्यात बनावट आयुर्वेदिक औषधांचा काळाबाजार आणि बोगस उपचार केंद्रांचा सुळसुळात दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे.

अनेक ठिकाणी परवानगीशिवाय आयुर्वेदिक उपचार केंद्रे चालवले जात आहेत,तर काही ठिकाणी खोट्या व दिशाभूल करणार्या जाहिरातींच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक आणि मानसिक फसवणूक केली जात आहे.विशेष म्हणजे आर्थिक राजधानी म्हणून ओळखल्या जाणार्या मुंबई शहरातही बनावट आयुर्वेदिक उपचार केंद्रांचे जाळे मोठ्या प्रमाणावर पसरले असल्याचे अनेकदा समोर आले आहे.मुंबई शहर आणि उपनगराच्या अनेक भागांमध्ये तसेच गर्दीच्या बाजारपेठांमध्ये अनेक तथाकथित आयुर्वेदिक उपचार केंद्रे, दवाखाने लोकांना हमीशीर उपचार देण्याच्या नावाखाली लुटत आहेत.काही केंद्रांवर कोणतीही वैद्यकीय पदवी नसलेले लोक स्वतःला डॉक्टर किंवा वैद्य म्हणून सादर करतात.मोठमोठे बॅनर, सोशल मीडियावरील जाहीराती आणि व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून कॅन्सर पूर्ण बरा,मधुमेह कायमचा नष्ट,किडनी विकारावर खात्रीशीर उपाय,गुडघे दुःखीपासून कायमची मुक्तता,लठ्ठपणा सात दिवसांत कमी अशा प्रकारच्या भ्रामक जाहिराती करून लोकांना जाळ्यात ओढत आहेत.सोशल मीडिया हे या बोगस व्यवसायाचे सर्वात मोठे माध्यम बनले आहे.
फेसबुक,यूट्यूब,
इन्स्टाग्राम आणि विविध वेबसाइट्सवर आकर्षक व्हिडिओ व बनावट अनुभव दाखवून लोकांचा विश्वास संपादन केला जातो. काही जण खोटे रूग्ण उभे करून ' आम्ही पूर्ण बरे झालो ' अशी प्रतिक्रिया दाखवतात.

यामुळे सर्वसामान्य लोक सहजपणे फसतात. विशेषतः गंभीर आजारांनी त्रस्त असलेले रूग्ण आणि त्यांच्या कुटुंबियांची मानसिक अवस्था लक्षात घेऊन त्यांची फसवणूक केली जाते.

राज्यातील अनेक बोगस आयुर्वेदिक उपचार केंद्रांमध्ये औषधांची कोणतीही गुणवत्ता तपासणी होत नाही. उत्पादन कुठे तयार झाले,त्यात कोणते घटक आहेत,त्याचा शरीरावर काय परिणाम होईल याबाबत कोणतीही अधिकृत माहिती नसते.काही ठिकाणी तर बनावट लेबल लावून औषधे विकली जातात.अशा औषधांमुळे यकृत, मूत्रपिंड आणि हृदयाशी संबंधित दुष्परिणाम होण्याची शक्यता असते.या वाढत्या प्रकारांमुळे केवळ आरोग्य व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण होत नाही,तर खर्या आयुर्वेद शास्त्राची प्रतिमाही मलिन होत आहे. आयुर्वेद ही भारताची प्राचीन आणि प्रभावी उपचार पद्धती मानली जाते.मात्र काही बोगस लोकांच्या गैरप्रकारांमुळे संपूर्ण आयुर्वेद व्यवस्थेबद्दल समाजात संशय निर्माण होत आहे.

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या आदेशानुसार राज्यभरातील सात जिल्ह्यांमध्ये १२ आयुर्वेदिक औषधविक्री आस्थापनांवर नुकतीच धडक कारवाई करण्यात आली. या कारवाईत तब्बल ७३ लाख २४ हजार ६५६ रूपयांचा मिसब्रँडेड व आक्षेपार्ह जाहिराती असलेला औषधसाठा जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे राज्यातील बनावट औषध व्यवसायाचे गंभीर वास्तव पुन्हा एकदा समोर आले आहे. जनतेच्या आरोग्याशी खेळ करणार्या कोणालाही प्रशासनाकडून कोणतीही सवलत दिली जाणार नाही. भ्रामक जाहिराती,अवैध औषध उत्पादन आणि बेकायदेशीर विक्रीविरोधातील कारवाई अधिक कठोर आणि सातत्यपूर्ण केली जाईल अशा स्पष्ट शब्दात आयुक्त तुकाराम मुंढे यांनी संबंधिताना इशारा दिला आहे. प्रशासनाची ही भूमिका महत्त्वाची असली,तरी प्रत्यक्षात राज्यातील अनेक शहरांमध्ये,ग्रामीण आणि शहरी भागात अजूनही बोगस आयुर्वेदिक उपचार केंद्रे खुलेआम सुरू असल्याचे वास्तव नाकारता येणार नाही.

त्यामुळे प्रशासनाने केवळ अधूनमधून कारवाई करून थांबता कामा नये.नियमित तपासण्या,परवाना पडताळणी,ऑनलाइन जाहिरातींवर नियंत्रण आणि बोगस आयुर्वेदिक दवाखान्यांवर तातडीने गुन्हे दाखल करणे आवश्यक आहे.तसेच नागरिकांनीही जागरूक राहणे तितकेच महत्त्वाचे आहे.कोणत्याही आयुर्वेदिक डॉक्टरांकडे उपचार घेण्यापूर्वी त्यांची अधिकृत नोंदणी,
वैद्यकीय पात्रता आणि औषधांचा परवाना तपासणे गरजेचे आहे.
संशयास्पद जाहिराती आणि अवैध उपचार केंद्रांची माहीती प्रशासनाला देणे ही प्रत्येक नागरीकांची प्राथमिक जबाबदारी आहे.
जनतेच्या जीवाशी खेळ करणाऱ्या बनावट औषध माफियांच्यावर तसेच बोगस डॉक्टरांच्यावर वेळीच आळा घातला नाही तर भविष्यात परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते.त्यामुळे सरकार, अन्न व औषध प्रशासन, आरोग्य विभाग आणि नागरिक यांनी एकत्रितपणे या बोगस साखळीविरोधात लढा उभारणे ही काळाची गरज बनली आहे

# म. न. से.शेतकरी सेनेच्या लातुर जिल्हाध्यक्षपदी अजित घंटेवाड यांची निवड....

**लोकनेता न्युज नेटवर्क**
जीवन जाधव औसा...

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज साहेब ठाकरे यांनी सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या लेकराला लातूर शेतकरी सेनेच्या जिल्हाध्यक्ष पदी काम करण्याची संधी दिल्याने सर्वत्र कौतुक..

बनसावरगाव गावचे सुपुत्र निष्ठावंत मनसैनिक आक्रमक चेहरा अजित घंटेवाड यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या शेतकरी सेना जिल्हाध्यक्षपदी निवड झाली असून. अजित घंटेवाड यांनी गेल्या 18 वर्षाच्या राजकारन कार्यकाळात 20 टक्के राजकारण तर 80 टक्के समाजकारण करत ग्रामीण भागातील अनेक सर्वसामान्य शेतकरी दिन दलित सह सर्व घटकातील लोकांसाठी काम करणारे अजित घंटेवाड . एखादा विषय लावून धरला तर त्या विषयाच्या खोलवर जाऊन समोरच्या व्यक्तीला न्याय मिळवून देण्याचं काम अजित घंटेवाड यांनी केला आहे.. संबंध महाराष्ट्राला परिचित असलेले अजित घंटेवाड यांनी शेतकऱ्यांच्या व सर्वसामान्यांच्या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी विविध आंदोलने उपोषणे व महाराष्ट्र



नवनिर्माण सेनेच्या माध्यमातून सर्वसमावेशक लोकांना न्याय मिळवून देण्याचे काम केलं आहे. अजित घंटेवाडे यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षात अनेक पदे भूषवले असून आतापर्यंत त्या पदाला साजेस काम केलं आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षाने अजित घटेवाड यांना शेतकरी सेनेच्या जिल्हाध्यक्षपदी काम करण्याची संधी दिली आहे येणाऱ्या काळात सर्वसामान्य गोरगरीब शेतकऱ्यांचा लढा लढण्यासाठी मी सदैव तत्पर असेंन वं मी शेतकरी सेवा करणार असल्याचं अजित घंटेवाड यांनी यावेळी सांगितले. महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षाने एका सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या लेकराला शेतकरी सेनेच्या जिल्हाध्यक्षपदी काम करण्याची संधी दिल्याने सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदनाचा वर्षाव केला जातोय .यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी सेना प्रदेशाध्यक्ष संतोष भाऊ नागरगोजे, जिल्हाध्यक्ष डॉ. नरसिंह भिकाणे , जिल्हाध्यक्ष शिवकुमार नागराळे, राज्य उपाध्यक्ष भागवत भाऊ शिंदे, नगरसेवक वाहेदभाई शेख, मनसे नेते अजय भैय्या धनेश्वर,निलंगा तालुकाध्यक्ष सचिन बिराजदार, सचिन शिरसाठ,लातूर शहराध्यक्ष मनोज अभंगे, मुकेश देशमाने
महेश बनसोडे, जिवन जंगाले
गोकुळ जाधव, दिपक तोलसुरे, गणेश चव्हाण, हाणमंत बोंबळे,नागनाथ स्वामी, हरीष जिंकलवाड,लक्ष्मण शिंदाळे , रामेश्वर सोनटक्के, रामेश्वर स्वामी, अविनाश झांबरे, परमेश्वर नवरखेले , विठ्ठल प्रसाद झांबरे,सरस्वती नवरखेले, दत्ता सूर्यवंशी,जयवंत सगर.सुनिल डोंगरगावे
पंकज स्वामी, प्रितम भुतडा सह सर्व महाराष्ट्र नवनिर्माण सेना पदाधिकारी वं कार्यकर्ते यांनी निवडीबद्दल अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या

# राजूनाना भुमरे यांच्या हस्ते शिवप्रतिमेचे पूजन; पाचोडमध्ये शिवराज्याभिषेक सोहळा संपन्न

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

पाचोड प्रतिनिधी | त्रिसिंग जायभाये

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त ग्रामपंचायत कार्यालय, पाचोड येथे शिवराज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. हा सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती श्री राजूनाना भुमरे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिवरायांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शौर्य, पराक्रम, दूरदृष्टी आणि लोककल्याणकारी राज्यकारभाराचा गौरव करत त्यांच्या विचारांचे स्मरण केले. शिवरायांनी स्थापन केलेल्या स्वराज्याच्या आदर्शांवर चालण्याचा आणि समाजहिताचे कार्य करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.
याप्रसंगी सरपंच शिवाजी भालसिंगे, ग्रामपंचायत अधिकारी श्रीकृष्ण कांबळे, जिजा पंच भुमरे, पाशु भाई, भागवत भुमरे, प्रल्हाद तारे, अनिल भुमरे, राहुल नारळे, संभाजी शेळके,धारकर हिंजूर्डे ग्रामपंचायत कर्मचारी बाबासाहेब वाळेकर तसेच बळीराम नरवडे यांची प्रमुख उपस्थिती होती. याशिवाय ग्रामस्थ आणि शिवप्रेमी मोठ्या संख्येने कार्यक्रमात सहभागी झाले होते.
सोहळ्यादरम्यान छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. उपस्थितांनी शिवरायांच्या कार्याला अभिवादन करत त्यांच्या विचारांचा प्रसार करण्याचे आवाहन केले. शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमामुळे ग्रामपंचायत कार्यालय परिसरात उत्साहाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले होते.

# तुंबळ गर्दी खेचणारी 'तुंबाडची मंजुळा' आली हो महाराजा.....!

**लोकनेता न्युज नेटवर्क**

कोकणातील निसर्गरम्य दृश्ये,भिती,रहस्य, विनोद आणि रोमान्स यांचा सुरेख मिलाप म्हणजे 'तुंबाडची मंजुळा' हा सिनेमा नुकताच रिलीज झाला. Social Horror हा विषय घेऊन विविध कोरगावकर यांचे दिग्दर्शन असलेला आणि उमेशकुमार बन्सल, बवेश जानवलेकर - झी स्टुडिओ निर्मित, मल्टी स्टारर, एक संगीतमय कलाकृती,एक कौटुंबिक मनोरंजन या सिनेमा निमित्त बघायला मिळाले . गेले अनेक दिवस मराठी प्रेक्षकांमध्ये टिझर आणि ट्रेलर मुळे चर्चा रंगलेली होती व या चित्रपटाबाबत कमालीची उत्सुकता लागलेली होती. आता हा चित्रपट सगळीकडे प्रदर्शित झाला आहे. (मी न बघितलेला) एका कन्नड चित्रपटाचा हा रिमेक आहे असे सांगण्यात आले आहे पण मराठीचा उत्तम इसेन्स अनुभवायला मिळाला आहे. कोकणातील एका गावातील ही कथा आहे.सामाजिक आशय सुद्धा कथानकात दडलेला आहे.

केशव (ओम भुतकर) च्या आजीच्या अंत्यविधीकरिता गावातील सगळी मंडळी जमलेली असतात. रवी अण्णा (जितेंद्र जोशी)जो गावातील सगळ्यांना मदत करणारा सोशल माणूस असतो तसेच, सतीश (अंशुमन विचारे) ,दिघ्या (गणेश पंडित) अशी काही मंडळी गावातील म्होरकी असतात. दरम्यान एक दिवशी केशवला भुतबाधा झाली आहे अशी अफवा गावात पसरते .घाबरलेल्या गावकऱ्यांमध्ये मध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण होते. गावकरी केशवच्या (ओम भुतकर च्या अंगातील भूत) उतरविण्यासाठी बाबा करुणाकर गुरूजी (मकरंद अनासपुरे) यांना गावामध्ये बोलावले जाते.
मग समजते की मंजुळा नावाच्या भुताने केशवला झपाटलेले आहे. यातूनच निर्माण होणारा गोंधळ आणि विनोदनिर्मिती मनोरंजन करून जातो. मंजुळा नक्की कोण आहे या प्रश्नाच्या उत्तरासाठी हा चित्रपट नक्कीच कुटुंबासोबत थिएटर मध्ये पाहावा.




दिग्दर्शक विविध कोरगावकरचा हा पहिलाच चित्रपट आहे असे वाटत नाही.
अभिनेता जितेंद्र जोशी, सई ताम्हणकर, मकरंद अनासपुरे, उषा नाडकर्णी, अंशुमन विचारे, योगेश शिरसाट, गणेश पंडित, वर्षा दांदळे, सिद्धेश्वर झाडबुके, शार्दुल सराफ, प्रियल नाईक आदी कलाकारांनी आपापली कामे चोख केली आहेत. अथर्व रुके हा प्रसिद्ध रिल स्टार चा अभिनय सुद्धा यात बघायला मिळेल.

ओम भुतकर चा निरागसपणा,जितेंद्र जोशी यांचे गावातील प्रभावशाली व्यक्तिमत्त्व , मकरंद अनासपुरे यांचा विनोदाचा अनोखा अंदाज चित्रपटासाठी 'चेरी ऑन द केक' असून त्यांनी ही भूमिका आपल्या स्टाईलने साकारली आहे.(त्यांची विनोदाची शैलीच वेगळी आहे).
प्रियल नाईक ने कोकणातल्या गावातील नायिका छान साकारली आहे. शोभाचा अभिनय पडद्यावर शोभला.
सई ताम्हणकर च्या अभिनया बद्दल काय सांगावे? चित्रपटाला खरा भावनिक आयाम मिळतो तो या व्यक्तिरेखे मुळे.परिस्थितीने रंजलेल्या या स्त्रीच्या डोळ्यांतून व्यक्त होणाऱ्या भावना अनेक प्रसंगांत संवादांपेक्षा अधिक प्रभाव टाकतात. त्यांचा प्रेझेन्स महत्त्वपूर्ण आहे. उषा नाडकर्णी एक हुशार आजी खूप हसवते.
अंशुमन विचारे,सिद्धेश्वर झाडबुके ,गणेश पंडित, योगेश शिरसाट यांच्या भूमिका भाव खाऊन जातात. हे सर्व पात्र अभिनयात बाप आहेत.कास्टिंग परफेक्ट असून यातला एक जरी पात्र नसेल तर कथा पुढे जाणार नाही असे एक समीक्षक म्हणून वाटते. प्रत्येकाचे पात्र महत्वाचे आहेत.
संवादाबद्दल काय बोलू?Good question, I like it.... ऋषिकेश तुरई व योगेश शिरसाट यांनी संवादासाठी मेहनत घेतली आहे.स्थानिक बोली भाषेचा अजून वापर करायला हवा होता.

तांत्रिक टीम बद्दल सांगायचे तर कौशल गोस्वामी यांची सिनेमा फोटोग्राफी चित्रपटाची सकारात्मक बाजू असून ड्रोन कॅमेरातून कोकणातील निसर्ग, गावातील वातावरण त्यांनी प्रभावीपणे कॅच केले आहेत. कोकणातल्या स्वर्गाचा आनंद बघायला मिळतो. संगीत गाणे प्रभावी आहेत. पद्मश्री हरिहरन यांच्या कर्णमधुर आवाजातील गाणे 'पुन्हा पुन्हा ' ऐकावे वाटते. चित्रपटाची एनर्जी वाढवणारे 'तर्राट'च संगीत व गाण्यातला स्वच्छंद फ्री स्टेप्स डान्स फुल जोश भरतो तसेच 'देवा मला पाव की रे' साठी सायली खरे चे विशेष कौतुक. तर अवधूत गुप्ते यांच्या आवाजातील 'झाडाने धरलंय भूत' थिएटर दणाणून टाकतो. या संगीत आणि गाण्यांमुळे कथेतील रहस्य आणि विनोद अधिक रंगतदार बनवते. संगीतकार असीम कुऱ्हेकर, प्रतीक केळकर आणि तेजस जोशी तसेच विशाल ददलानी, आर्या आंबेकर ,राहुल देशपांडे यांचा आवाजाची जादू बघायला मिळते. पार्श्वसंगीता चा तडका, लाइट्स मुळे प्रत्येक फ्रेम भारी झाली आहे.
थोडा पूर्वार्ध रेंगाळलेला वाटला ,पण उत्तरार्धात दाखवलेल्या घडामोडी अधिक प्रभावी वाटतात. एकंदरीत निखळ मनोरंजनासाठी आणि पोटधरून हसण्यासाठी मंजुळेला नक्की थिएटर मध्ये जाऊन भेट द्या...
'मंजुळा भेटू दे रे महाराज....!'
चित्रपटाला ४ स्टार.

**कुणाल साळुंके,**
**चित्रपट समीक्षक / फिल्म क्रिटिक**

# भोकरदन शहरात पाणीपुरवठ्याची भीषण दैना – 12 दिवसांनी पाणी, तेही

## अधिकारी-कर्मचाऱ्यांनी सार्वजनिकरित्या नळाचं पाणी पिऊन दाखवावं. ---- महजाद इस्लाम खान जालना जिल्हा उपअध्यक्ष आम आदमी पार्टि

**दै. लोकनेता न्यूज नेटवर्क**
भोकरदन डॉ. ज्ञानेश्वर जगताप

..............भोकरदन शहरात पाण्यासाठी हाहाकार माजला आहे. एकीकडे 10 ते 12 दिवसांनी पाणीपुरवठा होत आहे, तर दुसरीकडे जे पाणी येतं ते पिण्यायोग्य अजिबात नाही. नगर परिषदेचे कर्मचारी सांगतात की, "सरकारी नळातून येणारं पाणी फक्त पिण्यासाठीच असतं", पण माझा उघड दावा आहे की, भोकरदन नगर परिषदेतील एकही अधिकारी किंवा कर्मचारी नगर परिषदेच्या नळातून येणारं पाणी पीत नाही. आणि पीत असतील, तर त्यांनी सार्वजनिकरित्या येऊन सर्वांसमोर हे पाणी पिऊन दाखवावं.

नगराध्यक्ष, नगरसेवक किंवा स्वीकृत नगरसेवक – यापैकी एकही पदाधिकारी हे पाणी पीत नाही, हा माझा नगर परिषदेच्या पदाधिकाऱ्यांवर थेट आरोप आहे. मग ज्या गरीब जनतेला पाणी विकत घेणे परवडत नाही, तिने काय करावे? एकतर गढूळ पाणी पिऊन आजारांना आमंत्रण द्यावे, नाहीतर आर.ओ.चं पाणी विकत घेण्याची ताकद नसल्याने तहानलेली राहावी.

नगर परिषदेच्या अधिकारी व पदाधिकाऱ्यांना माझी स्पष्ट मागणी आहे: जर तुम्ही जनतेला दर तिसऱ्या दिवशी आणि स्वच्छ, पिण्यायोग्य पाणी देऊ शकत नसाल, तर खुर्चीचा राजीनामा द्या आणि दुसरा धंदा बघा. कारण निवडणुकीपूर्वी सर्वच पदाधिकाऱ्यांनी वचन दिलं होतं की, "आम्ही जनतेला स्वच्छ आणि दररोज पाणी देऊ". काहींनी तर "शहर जार-मुक्त करू" अशी बढाई मारली होती. प्रत्यक्षात मात्र यांच्या कार्यकाळात शहरात सर्वात जास्त पाण्याचे खासगी प्लांट सुरू झाले आहेत.
आज जुई धरणातील पाणीसाठा मृत




साठ्यापर्यंत खाली गेल्यावर यांना जाग आली आहे की, एसडीएमना पाणी चोरी थांबवण्याचे निवेदन द्यावे. आतापर्यंत काय सगळे कुंभकर्णासारखे झोपले होते का? असंच चालू राहिलं तर लवकरच शहरात लोक पाण्यासाठी तडफडताना दिसतील.

स्वच्छ आणि पिण्यायोग्य पाणी हा जनतेचा मूलभूत अधिकार आहे, ती नगर परिषदेची मेहेरबानी किंवा पदाधिकाऱ्यांचा उपकार नाही. ही गोष्ट जनता आणि नेते दोघांनीही लक्षात घ्यावी. जर 8 दिवसांत या समस्येचं निराकरण झालं नाही, तर आम आदमी पार्टी याविरोधात तीव्र आंदोलन छेडेल आणि सर्व पदाधिकाऱ्यांच्या राजीनाम्याची मागणी करेल.
काही समाजसेवक आणि पत्रकारांचा असाही आरोप आहे की, नगर परिषदेतील पाणीपुरवठा अभियंत्याचे वागणे हुकूमशाही पद्धतीचे आहे. कोणाचंही ऐकायचं नाही, मनमानी करायची आणि लोकांना उलट सांगायचं, "मी शिकून डिग्री घेऊन आलोय, तुमच्यापेक्षा मला जास्त कळतं".
---- महजाद इस्लाम खान
जालना जिल्हा उपअध्यक्ष
आम आदमी पार्टि

# मेळघाटचे माजी आमदार राजकुमार पटेल यांच्या वाढदिवस अनोख्या उपक्रमांनी साजरा

## खासदार बळवंतभाऊ वानखडेंच्या उपस्थितीत गुणवंत विद्यार्थी व महिलांचा सन्मान!




**लोकनेता न्यूज नेटवर्क**
धारणी प्रतिनिधी - रजनिश साकले

धारणी: मेळघाट मतदारसंघाचे माजी आमदार श्री. राजकुमारजी दयाराम पटेल यांचा वाढदिवस आज विविध सामाजिक, धार्मिक आणि सेवाभावी कार्यक्रमांचे आयोजन करून मोठ्या उत्साहात व अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला. देशाच्या व समाजाच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देणारे महापुरुष भगवान बिरसा मुंडा, रेंगा कोरकू, टंट्यामामा भील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्व. दयारामजी पटेल यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करण्यात आले.
वाढदिवसाचे औचित्य साधून सामाजिक बांधिलकी जपत स्थानिक उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना स्नेहभोजन देण्यात आले. स्थानिक बालाजी मंगल कार्यालय येथे मुख्य वाढदिवस महोत्सव आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला अमरावतीचे खासदार मा. बळवंतभाऊ वानखडे यांची प्रमुख उपस्थिती होती.
दहावी व बारावीच्या परीक्षेत ८०% पेक्षा जास्त गुण मिळवून मेळघाटचे नाव उंचावणाऱ्या ३० हून अधिक गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते 'सन्मानपत्र' आणि स्मृतीचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. धारणी शहरातील १० गरजू व होतकरू महिलांना स्वावलंबी बनवण्याच्या उद्देशाने सिलाई मशीनचे वाटप करण्यात आले, ज्यामुळे त्यांना हक्काचा रोजगार मिळून त्यांचे जीवन आत्मनिर्भर होण्यास मदत होणार आहे.
या भव्य सोहळ्याला सभापती रोहित राजकुमार पटेल, धारणी तालुका अध्यक्ष महेंद्रसिंह गैलवार, चिखलदरा अध्यक्ष सहदेव बेलकर, शहर अध्यक्ष शेख मुख्तियार, जाहिर भाई, हरेराम मालवीय, कालू मालवीय, नगरसेवक पंकज मोरे, राजा खान, राजकिशोर मालवीय, अनिता पाखरे, मीना मोहड, तसेच सामाजिक कार्यकर्ते गोलू खान, शेख मालिक, संतोष बैंस, योगेश गिरी, शोएब मेमन, दिलीप चतुर, बाबूलाल जावरकर, पटेल सर, मनीष मालवीय यांच्यासह राष्ट्रीय काँग्रेस पार्टीचे शेकडो कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुरमा येथील रामनाथ भानदास चिडे यांचे निधन




लोकनेता न्यूज नेटवर्क

पाचोड प्रतिनिधी /त्रिसिंग जायभाये

मुरमा येथील रहिवासी रामनाथ भानदास चिडे (वय 60 वर्षे) यांचे शुक्रवार, दि. 6 जून 2026 रोजी सकाळी दीर्घ आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच मुरमा व परिसरात हळहळ व्यक्त करण्यात आली.रामनाथ चिडे हे शांत, मनमिळावू व सामाजिक स्वभावाचे व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते. गेल्या काही काळापासून ते आजारी होते. उपचार सुरू असतानाच त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

त्यांचा अंत्यविधी दि. 6 जून रोजी दुपारी 2.30 वाजता मुरमा येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात पार पडला. अंत्यविधीप्रसंगी नातेवाईक, मित्रपरिवार व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात मुलगा सिद्धेश्वर रामनाथ चिडे, दोन मुली, सून, नातवंडे तसेच अन्य आप्तेष्ट असा परिवार आहे रामनाथ चिडे यांच्या निधनामुळे चिडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, परिसरातून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

# पारनेर पोलिसांनी महिलेवर अत्याचार करणाऱ्या भोंदू बाबा राजू दिवटेला ठोकल्या बेड्या.





लोकनेता न्यूज नेटवर्क

अहिल्यानगर प्रतिनिधी - बापुसाहेब घोडेस्वार अहिल्यानगर : आजकाल भोंदूबाबाचे प्रमाण खूपच वाढले आहे पारनेर तालुक्यात धक्कादायक बातमी समोर आली आहे. दिव्यांग मुलाचा आजार बरा करण्याचे तसेच भावाचे लग्न जमवून देण्याचे आमिष दाखवून ४० वर्षीय महिलेवर दोन वर्षापासून अत्याचार करणाऱ्या भोंदू बाबाला पारनेर पोलिसांनी बोल्हेगावातून ताब्यात घेतले. राजू बन्सी दिवटे रा. रुईछत्रपती (मुंबई) असे त्याचे नाव आहे. या प्रकरणात आरोपींनी पीडित कुटुंबाची साडेसहा लाखांची फसवणूकही केली आहे. २८ मे रोजी मुख्य आरोपी दिवटे याच्यासह तिघांविरुद्ध पारनेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

मुख्य आरोपी भोंदू बाबा राजू दिवटे याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्याने गुन्ह्याची कबुली दिल्याची माहिती तपासी अधिकारी पोलिस उपनिरीक्षक चांगदेव हंडाळ यांनी दिली. पारनेर न्यायालयाने त्यास ३ जूनपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. या गुन्ह्यातील भोंदू बाबाचा मुलगा शशिकांत राजू दिवटे व त्यांची सहकारी महिला शोभा अविनाश तरटे (रा. म्हसणे, पारनेर) यांना आधीच पोलिसांनी अटक केली होती. पारनेर न्यायालयाने त्यांना सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावलेली आहे. पीडित महिलेच्या फिर्यादीनुसार, तिच्या दिव्यांग मुलाला बरे करण्याचे, भावाचे लग्न जमेल व घरातील संकटे दूर करण्याचे आमिष दाखवून तीन आरोपींनी महिलेला देवीच्या पूजेच्या नावाखाली जाळ्यात ओढले. विविध पूजा, होमहवन, तंत्रमंत्र आणि देवीच्या बाधेचे कारण सांगत आरोपींनी तिच्याकडून लाखो रुपये उकळले. सुरुवातीला पूजा साहित्य, अंगारे, होमहवन यासाठी खर्च मागितला. नंतर सलग पूजा करावी लागेल, असे सांगून टप्प्याटप्प्याने मोठी रक्कम उकळण्यात आली. विशेष म्हणजे, ही रक्कम बँकेकडून कर्ज काढून दिल्याचेही तक्रारीत नमूद केले आहे. दरम्यान, मुख्य आरोपी राजू दिवटे याने दिव्यांग मुलाला जिवे मारण्याची धमकी देत तिच्यावर दोन वर्षापासून अत्याचार केला. दिलेले पैसे परत मागितले असता, त्याने शिवीगाळ, मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलिस उपनिरीक्षक चांगदेव हंडाळ पुढील तपास करीत आहेत.

# लामजना येथे वादळी वाऱ्यात वीज पडून म्हैस दगावली...



लोकनेता न्यूज नेटवर्क

जीवन जाधव औसा..

औसा तालुक्यातील लामजना येथे शुक्रवारी दुपारी तीन वाजेच्या सुमारास वादळी वारे व विजेच्या कडकडासह वीज पडून लामजना येथील शेतकरी पापामिया इस्माईल पटेल यांच्या म्हशीचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. प्राप्त माहितीनुसार, वादळी वारे पाऊस.वीज कोसळल्याने लामजना येथील अल्पभूधारक शेतकरी असलेले पापामिया इस्माईल पटेल यांची म्हैस दगावल्याने शेतकऱ्याच आर्थिक नुकसान झाल आहे. शेतकऱ्याची दुभती म्हैस दररोज 5 लिटर दूध देणारी म्हैस दगावल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत आला असून सरकार दरबारी मदतीची अपेक्षा शेतकरी करत आहे असल्याने. शेतकरी सरकारकडून नुकसान भरपाई आर्थिक मदत मिळावी अशी मागणी शेतकरी करत आहेत.

# मुखेडचे अण्णासाहेब जाहीरे यांची अखिल भारतीय होलार समाज संघटनेच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षपदी निवड

लोकनेता न्यूज नेटवर्क

संजय यलमवाड

मुखेड : अखिल भारतीय होलार समाज संघटनेच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षपदी मुखेडचे सन्माननीय व सर्वांचे स्नेही श्री. अण्णासाहेब जाहीरे यांची सर्वानुमते निवड झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

या निवडीच्या पार्श्वभूमीवर मुखेड काँग्रेस कमिटी आणि इरफान मल्टीसर्विसेस यांच्या वतीने सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी श्री. जाहीरे यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला तसेच त्यांच्या भावी कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

या कार्यक्रमास तालुका काँग्रेसचे कार्याध्यक्ष संभाजी पाटील उन्द्रीकर, काँग्रेस शहराध्यक्ष हणमंत नारनाळीकर, अशोक नगर मित्रमंडळाचे इरफान मोमीन यांच्यासह मित्रपरिवार व मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी श्री. जाहीरे यांच्या निवडीचे स्वागत करत त्यांना शुभेच्छांचा वर्षाव केला.



राष्ट्रीय पातळीवर मिळालेल्या या महत्त्वपूर्ण जबाबदारीमुळे मुखेडच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. श्री. अण्णासाहेब जाहीरे यांच्या नेतृत्वाखाली अखिल भारतीय होलार समाज संघटनेला नवी दिशा, नवी ऊर्जा आणि अधिक उंची प्राप्त होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

"कर्तृत्वाला लाभली राष्ट्रीय ओळख...!" या भावनेतून मुखेडकरांनी आपल्या लाडक्या नेतृत्वाचा गौरव करत अभिमान व्यक्त केला.

# कासार सिरसी-रामलिंग मुदगड पुलाचे काम 'कासवाच्या गतीने'; रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य, नागरिक त्रस्त!

लोकनेता न्यूज नेटवर्क

लातूर फिरोज जागीरदार

*निलंगा तालुक्यातील :

कासार सिरसी ते रामलिंग मुदगड दरम्यान सुरू असलेल्या पुलाचे काम अत्यंत संथ गतीने सुरू असल्याने या भागातील वाहतुकीचा मोठा खोळंबा झाला आहे. संबधित विभागाच्या ढिसाळ कारभारामुळे या मार्गावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून, सामान्य नागरिकांना आणि वाहनचालकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. विशेष म्हणजे, रस्ता खराब असल्याच्या कारणास्तव गेल्या अनेक महिन्यांपासून या मार्गावरील एसटी बस सेवा पूर्णपणे बंद असल्याने प्रवाशांचे हाल होत आहेत. *खड्ड्यांमुळे अपघातांचा धोका वाढला* सध्या या मार्गाची अवस्था अत्यंत अडचण झाली आहे. पुलाचे काम संथ गतीने चालू असल्यामुळे पर्यायी रस्त्याची व्यवस्था करण्यात आली खरी, मात्र त्याकडे प्रशासनाने पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. रस्त्यावर जागोजागी मोठे खड्डे पडल्याने दुचाकी आणि चारचाकी वाहनचालकांना कसरत करावी लागत आहे. रात्रीच्या वेळी तर हे खड्डे न दिसल्यामुळे अनेक छोटे-मोठे अपघात घडत आहेत.



*बस बंद; विद्यार्थी आणि चाकरमान्यांचे हाल*

> *"गेल्या अनेक महिन्यांपासून या मार्गावरील बसेस बंद आहेत. त्यामुळे शाळकरी विद्यार्थी, कॉलेजचे युवक आणि कामानिमित्त ये-जा करणाऱ्या चाकरमान्यांना खाजगी वाहनांचा महागडा प्रवास करावा लागत आहे. आर्थिक भुर्दंड सहन करूनही वेळेवर वाहन न मिळाल्यास अनेकदा पायपीट करावी लागते."*

- *स्थानिक गोविंद इंगळे पाटील *

*प्रमुख समस्या काय आहेत?*

* **संथ गतीने काम:* पुलाचे काम महिने उलटूनही संथ गतीने सुरू आहे, कंत्राटदारावर कोणाचेही नियंत्रण नसल्याचे दिसते.
* *खड्ड्यांचे साम्राज्य:* मुख्य रस्ता आणि डायव्हर्शन (पर्यायी मार्ग) पूर्णपणे खराब असून खडे पडले आहेत थोडासा पाऊस झालकी चिखलात अनेक गाड्या फसतात सीलिप होत आहे.
* *वाहतूक कोंडी:* अरुंद आणि खराब रस्त्यामुळे दररोज या भागात वाहतूक कोंडी निर्माण होत आहे.

आंदोलनाचा इशारा

प्रशासकीय अधिकाऱ्यांनी आणि संबंधित कंत्राटदाराने तात्काळ या पुलाचे काम युद्धपातळीवर पूर्ण करावे आणि रस्ता वाहतुकीसाठी योग्य करावा, अशी मागणी परिसरातील ग्रामस्थांकडून केली जात आहे. जर पुढील काही दिवसांत पुलाचे काम वेगाने सुरू झाले नाही आणि बस सेवा पूर्ववत सुरू झाली नाही, तर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संतप्त नागरिकांनी दिला आहे.

# प्रशासनाने 'रेग्युलेटरी' नव्हे तर 'डेव्हलपमेंट मोड'मध्ये काम करावे; प्रत्येक घरापर्यंत योजनांचा लाभ पोहोचविणार

लोकनेता न्यूज नेटवर्क

सेवा पवार

जिल्हा प्रतिनिधी गडचिरोली.

गडचिरोली, दि. ६ : शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत शंभर टक्के पोहोचविण्यासाठी प्रशासनाने केवळ नियमांची अंमलबजावणी करणारी यंत्रणा न राहता विकासाभिमुख दृष्टीकोन स्वीकारणे आवश्यक आहे. वन विभाग, पोलीस प्रशासन तसेच सर्व शासकीय यंत्रणांनी 'रेग्युलेटरी माइंडसेट' सोडून 'डेव्हलपमेंट मोड'मध्ये काम करावे, असे प्रतिपादन राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी कुरखेडा तालुक्यातील गुरनोली येथे ग्रामस्थांशी संवाद साधताना केले.

'विशेष सर्वेक्षण व सेवा समृद्धी मोहिमे'अंतर्गत निवड करण्यात आलेल्या गुरनोली ग्रामपंचायतीला मुख्य सचिवांनी भेट देऊन ग्रामस्थांशी थेट संवाद साधला. यावेळी ग्रामस्थांनी शेती, सिंचन, शिक्षण, रोजगार, महिला सक्षमीकरण, घरकुल, आरोग्य आणि पायाभूत सुविधांशी संबंधित विविध समस्या व मागण्या मांडल्या.

यावेळी विभागीय अपर आयुक्त माधवी खोडे, पोलीस उपमहानिरीक्षक योगेश कुमार, पद्मश्री डॉ. परशुराम खुणे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे, पोलीस अधीक्षक एम. रमेश, उमेदचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश सागर, सहाय्यक जिल्हाधिकारी अरुण एम., अपर जिल्हाधिकारी संजय आसवले, उपविभागीय अधिकारी प्रसनजित प्रधान यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.



मुख्य सचिव राजेश अग्रवाल म्हणाले की, पूर्वी नक्षल प्रभावामुळे अनेक योजना दुर्गम भागांपर्यंत अपेक्षित प्रमाणात पोहोचू शकल्या नाहीत. मात्र आता परिस्थिती बदलली असून शासनाचा भर प्रत्येक घरापर्यंत योजनांचा लाभ पोहोचविण्यावर आहे. गडचिरोली जिल्ह्यातील १२ गावांमध्ये विशेष सर्वेक्षण व सेवा समृद्धी मोहीम राबविण्यात येत असून सर्व पात्र लाभार्थ्यांना योजनांशी जोडण्याचे उद्दिष्ट आहे. गावातील कोणताही पात्र नागरिक केवायसी, आधार किंवा इतर कागदपत्रांच्या अभावी वंचित राहू नये यासाठी प्रशासन गावातच विशेष शिबिरे घेणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी त्यांनी वैयक्तिक वनहक्क व सामूहिक वनहक्क योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर देत प्रशासन आणि नागरिकांनी एकत्रितपणे विकासाची गती वाढविण्याचे आवाहन केले. गडचिरोलीतील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड क्षमता असून त्यांना योग्य संधी मिळाल्यास ते राष्ट्रीय स्तरावर यश मिळवू शकतात, असेही त्यांनी नमूद केले.

संवादादरम्यान ग्रामस्थांनी धान खरेदीचे थकीत चुकारे, शेतीसाठी सिंचन सुविधा, धान व मक्याला वाढीव हमीभाव, गोडाऊन उभारणी, हत्तींच्या उपद्रवामुळे होणारे नुकसान, शेतीपंपांसाठी अपुरा वीजपुरवठा, नदीवरील बंधारा, तलावांचे पुनरुज्जीवन यांसारख्या प्रश्नांकडे मुख्य सचिवांचे लक्ष वेधले.

शिक्षण क्षेत्रातील समस्यांबाबत ग्रामस्थांनी गुरनोली जिल्हा परिषद शाळेत सात वर्गांसाठी शिक्षकांची मागणी, तसेच केजी-१ व केजी-२ वर्ग सुरू करणे, ग्रामपंचायत स्तरावर अभ्यासिका व वाचनालय सुरू करणे आणि युवकांसाठी रोजगाराभिमुख सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली.

महिला बचत गटांच्या प्रतिनिधींनी ग्रामसंघासाठी स्वतंत्र हॉल, उद्योगनिर्मितीच्या संधी, तसेच आशा सेविकांचे प्रलंबित मानधन वेळेवर देण्याची मागणी केली. आरोग्य सुविधांमध्ये वाढ करून गावात आवश्यक वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याचीही मागणी ग्रामस्थांनी केली.

पायाभूत सुविधांच्या प्रश्नांमध्ये शिवटोला व टेकडीटोला येथे रस्त्यांची उभारणी, रोजगार हमी योजनेतील ऑनलाइन हजेरीच्या सर्व्हर समस्येमुळे मजुरांचे होणारे नुकसान, तसेच प्रलंबित घरकुल हप्त्यांबाबत नागरिकांनी मुख्य सचिवांचे लक्ष वेधले.

ग्रामसंवादादरम्यान जिल्ह्यातील सुशिक्षित नागरिकांनी गडचिरोलीला पर्यटन जिल्हा म्हणून विशेष दर्जा देणे, स्थानिक युवकांसाठी वर्ग-३ भरती प्रक्रिया जिल्हास्तरावर राबविणे, कौशल्य विकासाला चालना देणे, दिव्यांगांचे प्रलंबित मानधन वितरित करणे, विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना सुरू करणे आणि झाडीपट्टी रंगभूमीतील कलावंतांना शासनाच्या मानधन योजनेचा लाभ देण्याच्या मागण्या मांडल्या.

यावेळी अप्पर विभागीय आयुक्त माधवी खोडे यांनी ग्रामस्थांना निर्भयपणे आपल्या समस्या मांडण्याचे आवाहन केले. गावातील कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी कामात दिरंगाई करत असल्यास त्याची माहिती द्यावी, प्रशासन नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रभारी जिल्हाधिकारी नितीन गावंडे यांनी मोहिमेची माहिती देत, शासकीय योजनांच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी थेट नागरिकांकडून जाणून घेऊन त्यावर उपाययोजना करण्यासाठी विशेष सर्वेक्षण व सेवा समृद्धी हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे सांगितले.

दरम्यान, विशेष सर्वेक्षण व सेवा समृद्धी मोहिमेमुळे गुरनोली गावात विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी झाली असून अनेक योजनांमध्ये शंभर टक्के संतृप्ती साध्य करण्यात यश आले असल्याची माहिती देण्यात आली.

मुख्य सचिव यांनी यानंतर वडसा तालुक्यातील जागतिक बँक अर्थसहाय्यीत नयनपूर शेतकरी उत्पादक कंपनी स्मार्ट प्रकल्पास व कुरखेडा तालुक्यातील आदिवासी विकास महामंडळाच्या देऊळगाव धान खरेदी केंद्र भेट देऊन पाहणी केली

याप्रसंगी जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकारी तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

# इंडियन आर्मी सेवेत निवड झाल्याबद्दल सुगाव व पैसमाळ येथील

## सुपुत्रांचा काँग्रेसच्या वतीने सत्कार



लोकनेता न्यूज नेटवर्क

मुखेड : देशसेवेचे स्वप्न उराशी बाळगून भारतीय सैन्यात (इंडियन आर्मी) निवड झालेल्या मुखेड तालुक्यातील दोन होतकरू युवकांचा काँग्रेस पक्षाच्या वतीने सत्कार करून गौरव करण्यात आला.

सुगाव कॅम्प येथील शंकर गणपतराव दिवटे तसेच पैसमाळ येथील भाऊराव किशनराव पाटील यांची नुकतीच इंडियन आर्मी सेवेत निवड झाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे दोन्ही गावांसह संपूर्ण मुखेड तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

या यशस्वी युवकांच्या कर्तृत्वाची दखल घेत काँग्रेस पक्षाच्या वतीने त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी तालुका काँग्रेसचे कार्याध्यक्ष संभाजी पाटील उन्द्रीकर, काँग्रेस शहराध्यक्ष हणमंत नारनाळीकर, अशोक नगर मित्रमंडळाचे इरफान मोमीन, राजू बनसोडे यांच्यासह मित्रपरिवार उपस्थित होता. उपस्थित मान्यवरांनी दोन्ही युवकांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या.

युवकांनी कठोर परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर भारतीय सैन्यात स्थान मिळवून तालुक्याचे नाव उज्ज्वल केले आहे. त्यांच्या यशामुळे इतर तरुणांनाही देशसेवेची प्रेरणा मिळेल, असा विश्वास यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.

# एक पेड माँ के नाम" उपक्रमांतर्गत भाजप गडचांदूर मंडळाचे वृक्षारोपण

लोकनेता न्यूज नेटवर्क

चंद्रपुर/ सिद्धेश्वर केंद्रे

गडचांदूर, दि. ५ जून : केंद्रातील पंतप्रधान Narendra Modi यांच्या नेतृत्वाखालील मोदी सरकारची यशस्वी बारा वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने भारतीय जनता पक्ष, गडचांदूर मंडळाच्या वतीने जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून "एक पेड माँ के नाम" या उपक्रमांतर्गत वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

राजमाता अहिल्यादेवी होळकर उद्यान, वार्ड क्रमांक ५, गडचांदूर येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात मोठ्या संख्येने वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत उपस्थितांनी वृक्ष लागवडीसह त्यांचे संगोपन करण्याचाही संकल्प केला.

कार्यक्रमाला गडचांदूर मंडळाचे अध्यक्ष अरविंद डोहे, संयोजक तथा शहर महामंत्री व नगरसेवक सतीश बेतावार, सहसंयोजक, गणेश आदे, जिल्हा महिला मोर्चा अध्यक्षा विजयालक्ष्मीताई डोहे, तालुका महिला मोर्चा अध्यक्षा स्मिताताई




चिताडे, भारतीय जनता युवा मोर्चा तालुका अध्यक्ष विवेकानंद उरकुडे, नगरसेवक सुरज पांडे, अपर्णाताई उपलेंचवार, जयाताई लोहे, अरविंद कोरे, गणपत बुरडकर, देरकर, विनोद इंगळे, देविदास पेंदोर, सचिन चुरे, शालिका बेले, पौर्णिमा आवळे तसेच भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी लावण्यात आलेल्या प्रत्येक झाडाची जबाबदारी एका कार्यकर्त्याकडे सोपविण्यात आली. वृक्षसंवर्धनाचा संकल्प करत उपस्थितांनी पर्यावरण संरक्षणाची शपथ घेतली. तसेच मोदी सरकारच्या बारा वर्षांच्या विकासकामांना पर्यावरणीय सलामी देत "एक पेड माँ के नाम" हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी वृक्षांचे संगोपन व संवर्धन करण्याचा निर्धार व्यक्त केला. पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येक नागरिकाने वृक्षारोपणासह वृक्षसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# बीडच्या तहसीलदाराला ला.प्र.वि.चा सापळा,

## 7 लाखांची लाच घेताना रंगेहाथ पकडून अटक..

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

बीड विजय रोडे बीड : अवैध वाळू उपसा करणाऱ्या पोकलेन मशीनवर कारवाई न करण्यासाठी आणि 6 हायवा टीप्परना वाळू वाहतुकीची मुभा देण्यासाठी 7 लाख रुपयांची लाच मागणाऱ्या अंबडचे तहसीलदार विजय लक्ष्मण चव्हाण वय 47 यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीडच्या पथकाने शुक्रवारी रंगेहाथ अटक केली. ला.प्र.वि.घटक बीडचे पोलीस उप अधीक्षक श्री. सोपान चिटमपल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. असा होता प्रकार 36 वर्षीय मूळ तक्रारदार यांचा अवैध वाळू उपसा व्यवसाय आहे. तक्रारदार यांच्या पोकलेन मशीनवर कारवाई न करण्यासाठी आरोपी तहसीलदार चव्हाण यांनी 8 दिवसांसाठी 12 लाख रुपयांची मागणी केली होती. त्यापैकी 8 लाख रुपये तक्रारदार यांनी यापूर्वीच आरोपीला दिले होते. उर्वरीत 4 लाख रुपये आणि 6 हायवा टीप्परना वाळू वाहतूक करण्यासाठी प्रत्येकी 50 हजार प्रमाणे 3 लाख रुपये अशी एकूण 7 लाख रुपयांची लाच आरोपीने पुन्हा मागितली. लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदार यांनी ला.प्र.वि. बीड येथे तक्रार दिली. पंचासमक्ष पडताळणी, मग सापळा तक्रारीची पंचासमक्ष पडताळणी करण्यात आली. पडताळणीत आरोपीने लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर ठरल्याप्रमाणे लाचेची रक्कम स्वीकारताच छत्रपती संभाजीनगर येथील कासलीवाल मार्वल सोसायटीमधील रो हाऊस नंबर 119 येथे आरोपी तहसीलदार चव्हाण यांना रंगेहाथ पकडण्यात आले.
आरोपीकडून 7 लाख रुपये रोख जप्त करण्यात आले आहेत. याप्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7 व 12 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास ला.प्र.वि. बीड करत आहेत



# संत गाडगेबाबा महाराज समाजभूषण पुरस्कार जाहीर

## "सोनपेठ च्या ब्रह्माकुमारी मीरादीदी यांना जाहीर"

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

परभणी/प्रतिनिधी:- रमेश मुलगीर सोनपेठ शहरात गेल्या २१ वर्षापासून जनसामान्यांमध्ये आपल्या अलौकिक स्नेहाच्या आधारे आत्मिक प्रेम देणाऱ्या,नीती मूल्य जपवणूक शिकवणाऱ्या,महिला जागृती,महिला सशक्तिकरण,तणाव मुक्ती,व्यसनमुक्ती, शाश्वत योगिक शेती,राजयोग मेडिटेशन,अशा विविध विषयांवर ज्ञानदानाचे व अन्नदान अविरत कार्य करणारे व्यक्तिमत्व ब्रह्मकुमारी मीरादीदी (सोनपेठ सेंटर इन्चार्ज)यांना विद्यानिकेतन सामाजिक संस्था वाई,जिल्हा सातारा यांच्या वतीने राष्ट्रीय संत प्रेरणा पुरस्कार सोहळा २०२६ या कार्यक्रमांतर्गत राष्ट्रसंत प्रेरणा गौरव पुरस्कार संत गाडगेबाबा समाज भूषण पुरस्कार जाहीर झाला आहे.
हा पुरस्कार सोहळा दिनांक १४ जून रविवार रोजी सकाळी १० वाजता रमेश गरवारे सभागृह,लोकमान्य टिळक ग्रंथालय वाई,जिल्हा सातारा.या ठिकाणी विविध मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार सोहळा संपन्न होणार आहे.या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.श्री. शंकर घनश्यामदास अंदानी (मातृभक्त आचार्य सीए प्राचार्य.),प्रमुख पाहुणे किरण भोसले (संचालक यशश्री अकॅडमी वाई),डॉ. श्री.अशोक गोविंद नगरकर (ज्येष्ठ शास्त्रज्ञ डीआरडीओ पुणे)इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीमधे ब्रह्माकुमारी मीरादीदी यांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.
त्याग तपस्या सेवा समर्पण वृत्ती याचे मूर्ती मंत उदाहरण म्हणजे ब्रह्माकुमारी मीरादीदी,विद्यानिकेतन सामाजिक व शैक्षणिक संस्था वाई जिल्हा सातारा यांच्यावतीने समाजातील तळागाळातील समाज उपयोगी कार्य करणाऱ्या लोकांना पुरस्कार दिला जात असल्याचे मीरादीदी यांनी आपले मनोगत मध्ये सांगितले
संत गाडगेबाबा महाराज समाज भूषण पुरस्कार हा केवळ माझा एकटीच मानसन्मान नसून संपूर्ण ब्रह्माकुमारी विद्यालयाचा मान सन्मान आहे.व ईश्वरीय कार्याची धुरा सांभाळत असताना समाजातील लहान वयापासून वयोवृद्ध व्यक्तीपर्यंत सेवा करण्याची सुवर्णसंधी मला लाभलेले आहे.अशीच सेवा आपल्या सर्वांच्या कृपाशीर्वादाने व शिव परमात्मा कृपेने माझ्या हातून समाज उपयोगी कार्य घडत राहो हीच ईश्वरचरणी प्रार्थना करेन



व आपल्या सर्वांचे कायम दुवा आशीर्वाद पाठीशी घेऊन भावी जीवनातही आपल्या सर्वांच्या सहकार्याने अजून चांगले कार्य करण्याचा पूर्णपणे प्रयत्न करेल अशी ग्वाही मीरादीदी यांनी दिली.

# वादळग्रस्त इंदापूरकरांना धीर; कृषीमंत्र्यांकडून नुकसानीची पाहणी




**लोकनेतान्युज नेटवर्क**

शेळगाव प्रति- राहुल जाधव

शेळगाव - इंदापूर तालुक्यात झालेल्या अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर आज, ६ जून रोजी महाराष्ट्राचे कृषिमंत्री मा. दत्तात्रय (मामा) भरणे आणि इंदापूर तालुक्याचे तहसीलदार जीवन बनसोडे यांनी तातडीने नुकसानग्रस्त भागाचा दौरा केला.कृषिमंत्री आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी तालुक्यातील वडापुरी, सुरवड, गणेशवाडी, बावडा, टणू, पिंपरी बुद्रुक आणि लाखेवाडी या गावांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. त्यांनी थेट शेतकऱ्यांच्या शेतातील बांधावर जाऊन पिकांच्या नुकसानीची सद्यस्थिती जाणून घेतली.या संकटसमयी प्रशासनाने थेट आपल्या दारात येत संवाद साधल्यामुळे धास्तावलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. "शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये, शासन तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे," अशा शब्दांत कृषिमंत्र्यांनी शेतकऱ्यांना धीर दिला. तसेच, नुकसान झालेल्या प्रत्येक क्षेत्राचे वस्तुनिष्ठ पंचनामे करण्याचे आदेश त्यांनी तहसीलदार जीवन बनसोडे व संबंधित यंत्रणेला घटनास्थळावरूनच दिले

# शिवराज्याभिषेक दिनानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज पुतळा स्वच्छता व पूजन कार्यक्रम उत्साहात संपन्न



**लोकनेता न्यूज नेटवर्क**

चंद्रपुर/सिद्धेश्वर केंद्रे
गडचांदूर भारतीय जनता पार्टी गडचांदूर मंडळाच्या वतीने शिवराज्याभिषेक दिनाच्या मंगल पर्वानिमित्त हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची स्वच्छता व पूजन कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.
यावेळी गडचांदूर मंडळाचे अध्यक्ष अरविंद डोहे यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना संबोधित करत सायंकाळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर दिवे लावून रोषणाई करण्यात येणार असल्याचे सांगितले तसेच जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले.
कार्यक्रमास मंडळाचे अध्यक्ष अरविंद डोहे, कोरपना तालुका महामंत्री सतीश उपलेंचीवार, संयोजक तथा महामंत्री सतीश बेतावार, सहसंयोजक गणेश आदे, महामंत्री हरीश घोरे, महेश घरोटे, उपाध्यक्ष अरविंद कोरे, चिटणीस रमेश चुदरी, जयंता भोंगळे, सोमेश्वर सोनकांबळे, नगरसेवक सुरज पांडे, सुरेश मेश्राम, नगरसेविका सौ. कीर्ती वैरागडे, संगीता गाऊत्रे, कोरपना तालुका महिला आघाडी अध्यक्षा प्रा. सौ. चिंताळे मॅडम, युवा अध्यक्ष विवेकानंद उरकुडे, विठ्ठल धांडे, शाकीर भाई, बबलू रासेकर, गणपत बुरटकर, सचिन चुरे, विकी घोरे, नागेश रोहणे, नारायण सोनटक्के आदींसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.
शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा जागर करण्यात आला.

# गुन्हा दाखल न करण्यासाठी 50 हजारांची लाच मागितल्याचा आरोप

## एपीआयसह पोलिस कॉन्स्टेबल एसीबीच्या जाळ्यात,

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

छ.संभाजीनगर | डॉ.ज्ञानदेव चेपटे

छ.संभाजीनगर,दि. :६ छत्रपती संभाजीनगर शहरातील मुकुंदवाडी पोलीस ठाण्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मोठी कारवाई केली आहे. मुलीच्या वादासंदर्भात प्राप्त तक्रारीवर कारवाई टाळून गुन्हा दाखल न करण्यासाठी ५० हजार रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी सहायक पोलीस निरीक्षक संजय नागूसिंग बहुरे आणि पोलीस अंमलदार गोकुळ अनिलराव खटावकर यांना एसीबीने अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, २२ वर्षीय महाविद्यालयीन विद्यार्थ्याविरोधात काही दिवसांपूर्वी एका मुलीच्या प्रकरणात तक्रार प्राप्त झाली होती. संबंधित तरुण आणि तक्रारदार मुलगी यांच्यात समझोता होऊन वाद मिटला होता. मात्र तरीही प्राप्त तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्याची धमकी देत पोलिसांकडून ५० हजार रुपयांची मागणी करण्यात आल्याचा




आरोप आहे. या प्रकरणी तरुणाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. तक्रारीची पडताळणी केल्यानंतर एसीबीने सापळा रचला. लाचेचा पहिला हप्ता म्हणून १० हजार रुपये स्वीकारताना सहायक पोलीस निरीक्षक आणि पोलीस अंमलदाराला रंगेहात पकडण्यात आले. मुकुंदवाडी पोलीस ठाण्यात झालेल्या या कारवाईमुळे शहर पोलीस दलात एकच खळबळ उडाली असून एसीबीकडून पुढील तपास सुरू आहे.

# देगलूरमध्ये शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा

**दै. लोकनेता न्युज नेटवर्क**

देगलूर प्रतिनिधी/संतोष चिद्रावार लोणीकर हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ऐतिहासिक राज्याभिषेकाला ३५२ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने देगलूर शहरात शनिवारी (६ जून) जय भवानी.. जय शिवाजी ...च्या घोषणेमध्ये शिवराज्याभिषेक दिन मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. इ.स. १६७४ मध्ये रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य आणि ऐतिहासिक राज्याभिषेक सोहळा पार पडला होता. त्या सुवर्णक्षणाच्या स्मरणार्थ दरवर्षीप्रमाणे यंदाही सकाळी नऊ वाजता शिवराज्याभिषेक दिनानिमित्त शिवरायांच्या पुतळ्याला दुग्धाभिषेक करून अभिवादन करण्यात आले.यावेळी शिवस्मारक अध्यक्ष तथा नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष ॲड. अंकुश देसाई देगावकर, शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष तथा शिंदे सेनेचे युवा जिल्हाध्यक्ष नामदेव थडके पाटील , शिवसेना जिल्हा उपाध्यक्ष व्यंकटरावजी पाटील खतगावकर, अशोक पाटील राजुरकर, बालाजी पाटील थडके यांच्या हस्ते अभिषेक करण्यात आला. डॉ. सुनील जाधव यांनी जिजाऊ वंदना सादर करून उपस्थितांना शिवचरित्राच्या प्रेरणादायी विचारांची आठवण करून दिली. या कार्यक्रमास राजू पाटील मलकापुरकर, खालिद पटेल, माधव पाटील लिंगनकेरूरकर,



भागवत पाटील सोमुरकर, विठ्ठलराव भोसले, कैलास येसगे, जिजाऊ ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष सौ. चैतन्य वानखेडे, सचिव रंजना मानुरे, कार्याध्यक्ष दिपाली पाटील, संगीता कदम, उमाकांत भुताळे, विकास मोरे, सुनील थडके, शिवाजीराव वरखिंडे गवंडगावकर यांच्यासह अनेक शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.
तसेच गटविकास अधिकारी श्रीकांत बळदे, देवेंद्र मोतेवार, बांधकाम सभापती सुमंत कांबळे, नगरसेवक बसवराज द्याडे, सय्यद भाई, चंद्रकांत मोरे आणि सुनील नागशेट्टीवार यांनीही शिवरायांना अभिवादन केले."जय भवानी... जय शिवाजी..." च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. शिवभक्तांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. सूत्रसंचालन डॉ. सुनील जाधव यांनी केले तर आभार नामदेव पाटील देगावकर यांनी मानले.

# नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीची शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई द्या!

## भाजप नेते प्रदीप गारटकर,प्रविण माने यांची मागणी

**दैनिक लोकनेता न्यूज़ नेटवर्क**

इंदापूर,पुणे(बबनराव धायतोंडे)

:- इंदापूर तालुक्यात वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. विशेषतः केळी,डाळिंब,ऊस तसेच इतर भाजीपाला व फळबागांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून शेतकरी हवालदिल झाला आहे.
इंदापूर तालुक्यातील वडापुरी,सुरवड, वकीलवस्ती,शेटफळ हवेली,बावडा, टणू,गणेशवाडी,पिंपरी बु,लाखेवाडी, गिरवी या गावांमधील शेतकऱ्यांच्या शेतात मोठ्या प्रमाणावर पिकांची पडझड झाली आहे.अनेक ठिकाणी केळीची झाडे उन्मळून पडली असून डाळिंब बागांचेही मोठे नुकसान झाले आहे. ऊस पिकेही वाऱ्यामुळे आडवी झाली आहेत. या पार्श्वभूमीवर स्थानिक पातळीवर तात्काळ



पाहणी करण्यात आली असून भाजप नेते प्रदीप गारटकर व प्रविण माने यांनी संबंधित भागात प्रत्यक्ष बांधावर जाऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची भेट घेतली.त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या तसेच या कठीण प्रसंगी शेतकऱ्यांना धीर देण्याचे काम केले. यावेळी त्यांनी प्रशासनाकडे ठोस मागणी केली की,कृषी विभागाने तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ द्यावा.तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीसाठी सरसकट मदत व योग्य नुकसानभरपाई त्वरित देण्यात यावी.
भाजप नेते प्रदीप गारटकर व प्रविण माने यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, शेतकरी हा आधीच आर्थिक संकटात सापडलेला असून अशा नैसर्गिक आपत्तींमुळे त्यांची परिस्थिती अधिकच बिकट होते.त्यामुळे शासनाने संवेदनशील भूमिका घेऊन तातडीने मदत जाहीर करावी.

> राज्याचे कृषी मंत्री इंदापूर तालुक्याचे प्रतिनिधित्व करत असल्यामुळे त्यांनी तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सढळ हाताने मदत करावी.शेतकरी हा आधीच आर्थिक संकटात सापडलेला असून अशा नैसर्गिक आपत्तींमुळे त्यांची परिस्थिती अधिकच बिकट होते.त्यामुळे शासनाने संवेदनशील भूमिका घेऊन तातडीने मदत जाहीर करावी.
> **प्रदीप गारटकर**
> **जेष्ठ नेते, भाजपा इंदापूर**

त्याचबरोबर त्यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले की,या नैसर्गिक संकटात खचून जाऊ नये, शासन त्यांच्या पाठीशी उभे राहील यासाठी प्रयत्न सुरू आहेत. शासनाने या नुकसानीची गंभीर दखल घेऊन तात्काळ कार्यवाही करावी, अशी एकमुखी मागणी यावेळी करण्यात आली आहे.

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 7499615933

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ७४९९६१५९३३ .या अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या व लेखा या मधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही (वाद विवाद गेवराई न्यायालयाअंतर्गत)